प्रेस नोट

ला.प्र.वि.गोंदिया

| अ.क्र. | शिर्षक | तपशिल/कार्य नमुद करावे |
|---|---|---|
| १ | घटक | गोंदिया |
| २ | तक्रारदार | महिला वय ६४ वर्ष |
| ३ | आरोपी | श्री संदिप शाहुराव सानप वय ३१ वर्ष, पद–कनिष्ठ सहायक, वर्ग–३, आस्थापना विभाग पंचायत समिती गोंदिया. |
| ४ | तक्रार | तक्रारदार हया सेवानिवृत्त शिक्षिका असुन त्यांना पंचायत समिती शिक्षण विभाग गोंदिया येथुन पेंशन मिळु लागली, मिळणाऱ्या पेंशनचे त्यांनी अवलोकन केले असता ती कमी मिळत असल्याचे त्यांचे निदर्शनास आले तसेच त्यांनी संगणक हाताळण्याचे प्रशिक्षण घेवुन प्रमाणपत्र दिले असतांना ते न केल्याबाबत दर्शवुन त्यांचे पेंशन मधुन अंदाजे १,२०,०००/– रु. कपात केल्याचे निदर्शनास आले. तेव्हा त्यांनी एक ते दिड वर्षापुर्वी त्यांना मिळणारी पेंशन कमी असुन ती दुरुस्त होवुन नियमाप्रमाणे मिळणेबाबत तसेच संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र देवुन त्याचे कपात झालेले पैसे मिळणेबाबतचा अर्ज पंचायत समिती, शिक्षण विभाग गोंदिया येथे दिला होता. जुलै २०२६ मध्ये शिक्षण विभाग, पंचायत समिती गोंदिया येथे जावुन तेथील लिपीक श्री सानप यांना भेटुन कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी तुमचे बिल पाच लाखाचे वर आहे ते मंजुर करण्यासाठी तुम्हाला रु. ५०००/– दयावे लागतील असे म्हणाले. तेव्हा त्यांनी त्यांना माझ्याकडे आता ऐवढे पैसे नाहीत असे म्हणाले. तेव्हा त्यांनी आता तुमच्याकडे किती पैसे आहेत असे विचारले असता त्यांनी त्यांचेकडे १०००/– रुपये असल्याचे सांगीतले. त्यांनी हजार रुपये आता दया व राहीलेले चार हजार रुपये नंतर दया असे म्हणुन रु. १०००/– त्यांच्याकडुन घेतले. त्यानंतर श्री सानप लिपीक यांनी त्यांना फोन करुन तुमचे बिल मंजुर झाले असुन त्याचा चेक तयार आहे, राहीलेले रु. ४०००/– घेवुन या व चेक घेवुन जा असे सांगीतले. तेव्हा त्यांना ते व त्यांचे पती आजारी असल्याचे सांगुण बरे झाल्यावर चेक घेण्यासाठी येतो असे सांगीतले. श्री सानप लिपीक शिक्षण विभाग, पंचायत समिती गोंदिया हे मागत असलेले रु. ४०००/– हि कायदेशिर फिस नसुन स्वत: करीता लाच मागत |

| | | |
|---|---|---|
| | | असल्याने व त्यांना हि लाच रक्कम देण्याची त्यांची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरुध्द तक्रार दिली. |
| ५ | तक्रारीची पडताळणी | दिनांक दि. १७.०९.२०२६ रोजी वेळ १२.४४ ते १३.५५ वा दरम्यान तक्रारदार यांचेजवळ कार्यालयीन डिजिटल व्हाईस रेकार्डर देवुन महिला पंचासह लाच मागणीची पडताळणी करीता पंचायत समिती गोंदिया येथील शिक्षण विभागात पाठविले असता आलोसे श्री संदिप शाहुराव सानप पद—कनिष्ठ सहायक, आस्थापना विभाग पंचायत समिती गोंदिया यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे पेंशनचे अेरीयस बिल मंजुर करुन चेक देण्याकरीता रु. ४,०००/— लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. |
| ६ | सापळा कार्यवाही | दिनांक दि. १७.०९.२०२६ रोजी वेळ १५.०३ ते १५.२७ वा दरम्यान पंचायत समिती गोंदिया येथे सापळा कार्यवही दरम्यान महिला पंचाचे उपस्थितीत तक्रारदार यांचेकडे त्यांचे पेंशनचे अेरीयस बिल मंजुर करुन चेक देण्याकरीता रु. ४,०००/— लाच रक्कम स्विकारुन आपले लोकसेवक पदाचा गैरफायदा घेतला आहे |
| ७ | गुन्हा रजि.नं. /कलम/पो.स्टे. /जिल्हा/दि.व वेळ | गु.नं.७२६/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम १९८८ (संशोधन २०१८), पोलीस स्टेशन गोंदिया शहर, जि. गोंदिया, दिनांक १७.०९.२०२६ चे वेळ २२.४३ वा. |
| ८ | आरोपी अटक दिनांक वेळ | दिनांक १७.०९.२०२६ चे वेळ २३.१५ वा. |
| ९ | सापळा अधिकारी | अरविंद पुंडलिक राउत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. ८२७५२९८४७५. |
| १० | पर्यवेक्षक अधिकारी | श्री. निलेश लोधी, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. गोंदिया |
| ११ | सापळा पथक | श्री. निलेश लोधी, पोलीस उपअधिक्षक, पो.नि.अरविंद राउत, उमाकांत उगले,स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा संजयकुमार बोहरे, मंगेश काहालकर, संतोष शेंडे, संतोष बोपचे, अशोक कापसे,नापोशि. कैलाश काटकर, प्रशांत सोनेवाने, मपोना संगिता पटले, रोहिणी डांगे व चालक दिपक बाटबर्वे सर्व ला. प्र.वि. गोंदिया |
| १२ | मार्गदर्शक | डॉ. दिगंबर प्रधान पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नागपुर मो क्र. ९९२३१८५५६६, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर, मो.क्र.७०३८४३६४४१, श्री. |

| | | |
|---|---|---|
| | | विजय माहुलकर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर मो.क्र.९९२३१४२५६९ |

१३.लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे सर्व नागरीकाना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | गोंदिया घटक कार्यालय | नागपुर परिक्षेत्र कार्यालय | ला.प्र.वि. मुख्यालय |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| पत्ता | गोंदिया, तिरोडा रिंग रोड, रेल्वे क्रासिंग जवळ गोंदिया पिन ४४१६०१ | २रा माळा प्रशासकिय ईमारत क्र. १ सिव्हील लाईन्स नागपुर | सर पोचखनवाला मार्ग, वरळी मुंबई—४०००३० |
| दुरध्वनी क्रमांक व्हॉटस अप क्रमांक १०६४ | ०७१८२—२५१२०३<br>९२०९०४१०६४ | ०७१२—२५६१५२०<br>९०६७६७१०६४ | ०२२—२४९२१२१२ |
| ई—मेल आयडी | acbgondia@gmail.com | spacbnagpur@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

कार्यालय-पोलीस उप अधिक्षक<br>सत्यमेव जयते<br>अँटी करप्शन ब्यूरो, गोंदिया